(87)

क्रमांक: प्राधिकरण - ६ - 2749.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
१८ वा मजला, न्यु ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डींग,
मॅदाम कामा रोड, मुंबई ४०० ०२१.
दिनांक १७ जुलै १९७६.

सोबत प्राधिकरणाच्या दिनांक २८ जून १९७६ रोजी झालेल्या सहाव्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत जोडली आहे.

सही/-
स्टाफ ऑफिसर.

प्रति:-

सर्व सदस्य.

Issued 17 JUL 1976

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या, दिनांक २८ जून १९७८
रोजी भरलेल्या सहाव्या बैठकीचे कार्यवृत्त.

(१) उपस्थित सदस्यांची सूची सोबत जोडली आहे. (जोडपत्र 'अ').

(२) बैठकीच्या प्रारंभी अध्यक्षांचे भाषण झाले, भाषणाची प्रत (जोडपत्र 'ब') म्हणून जोडली आहे.

(३) बाब क्रमांक (१) : मागील बैठकीच्या (सहाव्या) कार्यवृत्ताला पुष्टी देणे.

ठराव (७१):

२६ मार्च १९७८ रोजी भरलेल्या बैठकीच्या कार्यवृत्तास, पुढील सुधारणांस अधीन राहून, पुष्टी देण्यात आली :-

ठराव क्रमांक ६५ ची सुधारणा :

''(ब) कार्यसूची टिप्पणीच्या परिच्छेद ११ मध्ये बाबनिहाय वर्णन केलेला व स्पष्ट केलेला कामकाजाचा कार्यक्रम आणि पदांची स्थापना यांना मान्यता देण्यांत यावी आणि महानगर आयुक्तास प्रत्येक प्रकरणात सुचविल्याप्रमाणे पुढील कारवाई करण्याची विनंती करण्यात यावी.

(एक) ठराव क्रमांक ५८ द्वारे व त्यानुसार निर्माण करण्यात आलेली लेखांकन व वित्तीय आस्थापनेची रचना (वित्तीय सल्लागार हा जिचा प्रमुख असेल) ही, प्राधिकरणाच्या लेखांकन व वित्त व्यवस्थापन विभागात करण्यात यावी.''

ठराव क्रमांक ६७ ची सुधारणा :

परिच्छेद दोन पुढील प्रमाणे वाचावा:-

''दोन, प्राधिकरणाने असाही निदेश दिला आहे की, कार्यकारी मंडळासंबंधीचे तत्सम प्रस्ताव हे महानगर आयुक्ताने अध्यक्ष व सदस्य - सचिव यांच्याशी विचारविनिमय करून, तयार करावेत आणि ठराव ५२ अन्वये अगोदरच नियुक्त करण्यात आलेल्या समितीपुढे ते विचारार्थ मांडावेत आणि नंतर आदेशां-साठी ते प्राधिकरणास सादर करावेत.''

बाब क्रमांक २ :

मागील बैठकीच्या कार्यवृत्तांवर केलेली कार्यवाही.

....२

ठराव ७२ :

केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. योग्य अशा वस्त्यांमधील चटईक्षेत्र निर्देशांकात केलेल्या कपातीच्या विशेष संदर्भासह, मुंबईतील जमिनीच्या वापरावरील नियंत्रणविषयक बाबी, जुलै महिन्यात वाशी येथे होणा-या प्राधिकरणाच्या (विशेष) बैठकीत मांडण्यात याव्यात, या गोष्टीस मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक (३):

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळाच्या सदस्यांना भत्ते देणे) विनियम, १९७६.

ठराव ७३ :

प्राधिकरणाने जोडपत्र 'क' मध्ये दर्शविलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळाचे सदस्य व कायमचे आमंत्रित यांना भत्ते देणे) विनियम, १९७६ यांना मान्यता दिली.

बाब क्रमांक (४):

प्राधिकरणाचा १९७६-७७ चा अर्थसंकल्प.

ठराव ७४ :

ठराव करण्यांत येत आहे की,

(एक) वित्तीय सल्लागार, प्राधिकरणाच्या ऑगस्टमध्ये होणा-या पुढील संपूर्ण बैठकीत नेहमीचा अर्थसंकल्प सादर करील.

(दोन) अर्थसंकल्प तयार होईपर्यन्त व तो मंजूर होईतोपर्यन्त महानगर आयुक्तास, वित्तीय सल्लागाराच्या सहमतीस अधीन राहून, (१) सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या पदांचे वेतन व भत्ते इत्यादींवरील खर्च करण्याचा (२) पहिल्या सभेतील ठराव ६ अन्वये अगोदरच प्राधिकृत केल्याप्रमाणे दैनंदिन प्रशासकीय खर्च करण्याचा आणि (३) फर्निचर व कार्यालयीन साधन-सामग्री यांवरील रुपये ६०,००० पर्यन्तचा खर्च करण्याचा, -

प्राधिकार देण्यात आला आहे. (अर्थसंकल्पाच्या प्रपत्रांना अंतिमरूप देण्यात येईल तेव्हा या सर्व बाबींवरील खर्चाचा त्यात समावेश केला पाहिजे व प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी त्याला सादर करण्यात आला पाहिजे).

बाब क्रमांक (५):

'ईस्ट आयलंड टोलवे' प्रकल्प.

ठराव ७५ :

प्राधिकरणाने ईस्ट आयलंड टोलवे प्रकल्पाच्या प्रस्तावावर विचार केला व तो प्रस्ताव एकमताने मान्य केला, व जागतिक बँकेच्या मूल्यनासाठी, जागतिक बँकेच्या मूल्यनासाठी, जागतिक बँकेला तसेच बँकांना तो प्रकल्प सादर करण्याच्या प्रयोजनासाठी भारत सरकारचा पाठिंबा व मान्यता मिळावी म्हणून तसेच त्यांच्या कडून किती वित्त पुरवठा होईल याची शक्यता अजमावण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्तास प्राधिकृत करण्यात आले आहे. मुंबईच्या योग्य विकासासाठी या प्रकल्पास सर्वात अधिक प्राधान्य देण्यात यावे असे प्राधिकरणास वाटते. प्रकल्पाचे मूल्यन जे सध्याच्या निर्णयानुसार करतील अशा तज्ञांशी विचार विनिमय करून काढण्यात आलेला प्रकल्पाचा खर्च व त्याची वैशिष्टये यांना अंतिम मान्यता देण्याकरिता, प्रकल्पाचा अंतिम आराखडा प्राधिकरणापुढे मांडण्यात येईल यांची नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक (६):

नव्या मुंबईची प्रारूप विकास योजना.

ठराव ७६ :

ही बाब, जुलै महिन्यात वाशी येथे होणा-या विशेष बैठकीत विचार करण्यासाठी, स्थगित ठेवण्यात आली.

बाब क्रमांक (७):

उल्हासनगरातील नवीन (स्वयंचलित) दूरध्वनी केंद्रासाठी (टेलिफोन एक्स्चेंज) जमीन.

ठराव ७७ :

प्राधिकरणाने, भारत सरकारच्या टेलिकम्युनिकेशन विभागाकडून स्थापन करण्यात येणा-या नवीन केंद्रासाठी, उल्हासनगरातील भूमिखंड क्रमांक १-ए-ए, १-ए-२, १-ए-३ व १-ए-४ यातील सुमारे २७५३ चौरस यार्ड जमीन संपादन करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये उक्त संपादनासाठी राज्य शासनाकडे विनंती करावी

...४

यासाठी महानगर आयुक्तास प्राधिकृत केले. जमीन संपादन केल्यानंतर, प्राधिकरणाने ती भारत सरकारच्या टेलीकम्युनिकेशन डिपार्टमेंटला विचार विनिमयानंतर परस्पर ठरलेल्या अटींवर उपलब्ध करावी.

बाब क्रमांक (८):

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रदेशातील नगरपालिकांसाठी मध्यवर्ती सेवा गट स्थापन करणे.

ठराव ७८:

प्राधिकरणाच्या कल्याण समूहाच्या कार्यालयात, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रदेशातील नगरपालिकांकरिता मध्यवर्ती सेवा गट स्थापन करण्याच्या प्रस्तावाला, प्राधिकरणाने तत्वत: मान्यता दिलेली आहे; आणि पुढील तात्पुरती पदे निर्माण करण्यासाठी मंजुरी दिली आहे :-

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता | - | १ |
| उप अभियंता | - | २ |
| कनिष्ठ अभियंता. | - | २ |
| आरेखक. | - | १ |
| टंकलेखक. | - | १ |
| चपराशी. | - | १ |

कार्यसूची टिप्पणीमधील गटाकडे सोपविण्यात यावयाच्या कामासाठी महानगर आयुक्तास, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमाच्या कलम ७२ अन्वये, गटाच्या अभियांत्रिकी कर्मचारी वर्गाला, राज्याच्या अभियांत्रिकी कर्मचारी- वर्गाचा दर्जा मिळवून देण्यासाठी, शासनाकडे प्रस्ताव करावा याकरिता, प्राधिकार देण्यात आला आहे.

स्थायी समितीने संबंधित नगरपालिकांच्या अध्यक्षांशी विचार विनिमय करुन, (ज्यांना बैठकींना बोलावण्यात येईल), प्रस्तावाच्या वित्त व्यवस्थेसंबंधी विचार करावा आणि मान्यतेसाठी तो प्राधिकरणापुढे मांडावा. विशेषात: नगरपालिकांनी खर्चाचा हिस्सा देण्याच्या शक्यतेचा विचार विनिमय करण्यात यावा.

कार्योत्तर, स्थायी समितीने मंजूर केलेला प्रस्ताव मान्यतेसाठी प्राधिकरणापुढे ठेवण्यात येईल.

...५

बाब क्रमांक (९):

कल्याण समूहामधील क्षेत्र विकास प्रकल्प.

ठराव ७९ :

प्राधिकरणाने कल्याण समूहाच्या क्षेत्र विकास प्रकल्पांच्या कार्यसूची टिप्पणीमधील रूपरेषेनुसार प्रस्तावास मान्यता दिली, आणि ठराव केला की,

(एक) हौसींग, अर्बन रिन्युअल व अॅकॉलॉजी मंडळाकडून तपशिलवार योजना महानगर आयुक्तांनी तयार करवून घ्याव्या आणि त्या योजना हाती घेतील व त्याकरिता ज्यांना प्राधिकरणाकडून कर्ज देता येतील अशी अभिकरणे (अेजन्सीज) शोधली पाहिजेत;

(दोन) अहवालांच्या आधारे, स्थायी समिती, संबंधित अधिकरणांना अपेक्षित असलेले कर्ज मंजूर करू शकेल ;

(तीन) व्याजाचा दर, परतफेडीची मुदत, असल्यास, कोणतीही हमी इत्यादि कर्जाच्या अटी व शर्ती, स्थायी समितीकडून निश्चित करण्यात येतील.

(चार) प्राधिकरणाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास निधीमधून रकमा संवितरित करण्यात येतील.

बाब क्रमांक (१०):

प्राधिकरणाच्या कार्यकारी मंडळाची कर्मचारी - वर्ग व्यवस्था.

ठराव ८०:

प्रख्यापित करण्यात आलेल्या अध्यादेशाचे उपबंध विचारात घेऊन, ही बाब मागे घेण्यास परवानगी देण्यांत आली.

...................

...६

( जोडपत्र - 'अ' )

## दिनांक २८ जून १९७६ रोजी झालेल्या सहाव्या सभेसाठी उपस्थित असलेल्या सभासदांची यादी.

सभासदांची नांवे :

डॉ. रफिक झकारिया, मंत्री, नगर विकास.
श्री जगेश देसाई, राज्यमंत्री नगर विकास.
श्री मनोहर जी. जोशी, मुंबईचे महापौर.
श्री एस. ए. सोळंके, मंत्री, गृहनिर्माण.
श्री पी. के. कुंटे, राज्यमंत्री, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम.
श्री एस. जी. घोलप, उपमंत्री, लघु पाटबंधारे, [illegible] दुग्धोत्पादन, [illegible] व खार जमिनींचा विकास.
श्री व्ही. जी. प्रभुगावकर, राज्यमंत्री,
अर्थ, अल्प बचत, नियोजन आणि मच्छीमारी.
श्री हाशू अडवानी, मुंबई.
श्री जे. सी. अग्रवाल, अध्यक्ष, बी.पी.टी.
श्री जी. एम. बनातवाला, विधान सभा सदस्य, मुंबई.
श्री एस. डी. बसवंत, विधान सभा सदस्य, शहापूर.
श्री हंस भूग्रा, मुंबई.
श्री सी. एम. कोरिआ, अध्यक्ष, हाऊसींग, अर्बन रिन्युअल आणि टेक्नॉलॉजी मंडळ.
श्री बी. जी. देशमुख, नगरपालिका आयुक्त,
मुंबई महानगरपालिका.
श्री एस. एस. दिघे, विधान सभा सदस्य, मुंबई.
श्री ए. एल. गुप्ता, जनरल मॅनेजर, मध्य रेल्वे.
श्री सुधीर जोशी, मुंबई.
श्री एच. ए. खांडवानी, मुंबई.
श्री डी. के. खानविलकर, अध्यक्ष, अलिबाग नगर परिषद.
श्री सोहन सिंघ कोहली, मुंबई.
श्री व्ही. एस. महाडिक, अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका.
श्री सी. एस. मेहता, अध्यक्ष, बेस्ट समिती, मुंबई महानगरपालिका.

...

श्री पुष्पकांत ए. म्हात्रे, मुंबई.
श्री एस्. जी. के. मूर्थी, अध्यक्ष, वॉटर रिसोअरसेस मॅनेजमेंट मंडळ
श्री एस्. एस्. मूथन्ना, जनरल मॅनेजर, बॉम्बे टेलिफोन्स.
डॉ. एस्. जी. परनळेकर, सभापती, वसई नगर परिषद.
श्री डी. बी. पाटील, विधान सभा सदस्य, पनवेल.
श्री डी. एस्. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, पनवेल.
श्री नकूल पी. पाटील, विधान सभा सदस्य, डोंबिवली.
श्री व्ही. के. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी.
श्री व्ही. के. टेंबे, विधान सभा सदस्य, मुंबई.
श्रीमती कमला रामन, विधान सभा सदस्य, मुंबई.
श्री व्ही. रामनाथन, जनरल मॅनेजर, पश्चिम रेल्वे.
श्री डी. डी. साठे, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
श्री एस्. पी. ठक्कर, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगरपालिका.
श्रीमती ताराबाई वर्तक, सभापती, जिल्हा परिषद, ठाणे.
श्री एस्. एस्. वंगारे, सभापती, जिल्हा परिषद, कुलाबा.
महाराष्ट्र शासनाचे सचिव, नगर विकास (निमंत्रीत).
कार्यकारी संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र. (निमं

.................

: जोडपत्र 'ब' :

महसूल, नगर विकास, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष, डॉ. रफिक झकारिया, यांनी दिनांक २८ जून १९७६ रोजी सहाव्या बैठकीत केलेले भाषण :-

मानननीय सदस्य,

मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहात आपण ही बैठक प्रथमच घेत आहोत याचा मला आनंद होत आहे. माजी महापौर श्री नानालाल मेहता यांनी ह्या प्राधिकरणाची स्थापना व त्याचे कामकाज याबाबतीत जे सहकार्य व सहाय्य दिले आहे त्याची आपणास सदैव आठवण राहील. सध्याचे महापौर श्री मनोहर जोशी हे देखील ही परंपरा अशीच पुढे चालू ठेवतील अशी आमची अपेक्षा आहे.

शासनाने आपल्या प्राधिकरणासंबंधीच्या कायद्यात एका अध्यादेशा द्वारे नुकतीच सुधारणा केली आहे. या सुधारणांच्या मागे, स्थायी समिती व कार्यकारी समिती यांची कर्तव्ये व कामे या सारख्या, प्राधिकरणाच्या अंतर्गत कामकाजाशी संबंधित अशा बाबी सविस्तरपणे मांडण्याचा हेतु आहे. अधिनियमात ज्याची कर्तव्ये व कामे ठरवून देण्यात आली आहेत अशा वित्तीय सल्लागाराच्या नेमणुकीचा अधिकार शासनाने स्वत:कडे घेतला आहे. ही एक आवश्यक व स्पष्ट अशी बाब होती. त्याचप्रमाणे असेही जाहीर करण्यात आले आहे की, प्राधिकरणाच्या कार्यकारी कामकाजाच्या बाबतीत महानगर आयुक्त हा, संपूर्ण कर्मचारी वर्ग व अधिकारी वर्ग यांचा प्रमुख म्हणून काम करील. या खेरीज अधिनियमाच्या कलम १२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, प्राधिकरणाचा कर्तव्यांचा व कामाचा देखील आढावा घेण्यांत आला आहे. पूर्वीच्या जवळ जवळ सर्व नोंदीमध्ये शाब्दिक फेरफार करुन त्या तशाच ठेवताना, काही स्वागतार्ह अशा आणखी नोंदीचीही भर घालण्यात आली आहे. अर्थातच संबंधित विधेयक संमत करताना, अधीक सुधारणा विधेयकात समाविष्ट कराव्यात असे विधान मंडळाला वाटल्यास, तसे करता येईल. त्याच प्रमाणे, प्राधिकरणाचा कारभार तोट्यात चालणार नाही आणि तसा तो तोट्यात चालल्यास, नंतरच्या वर्षात तोटा भरुन काढण्यात येईल असे स्पष्ट करण्यात येत आहे. प्राधिकरणाचे कामकाज अधिक संघटितपणे व सहेतुकपणे चालावे यासाठी करण्यांत आलेले हे सर्व उपबंध यथायोग्य आहेत.

या सर्व प्रकारात कार्यकारी मंडळाचा दर्जा यापूर्वी कायद्यानुसार अभिप्रेत असलेल्या दर्जापेक्षा काही वेगळा राहील काय याबद्दलच्या काही शंका माझ्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. परंतु वस्तुस्थिति तशी नाही. या कायद्यात यापूर्वी, प्राधिकरणाचे कायदेशीर घटक म्हणून, ज्या प्रयोजनासाठी कार्यकारी मंडळे अंतर्भूत करण्यात आली होती ती प्रयोजने पार पाडण्यासाठी त्याहून अधिक अशी कार्यकारी नियंत्रणे असू नयेत हे, सरकारी व खाजगी प्रशासनात सुविख्यात असलेले तत्व स्पष्टपणे पुन्हा एकदा मांडणे याशिवाय कोणताही फेर बदल करण्यात आलेला नाही. शासनाने, प्राधिकरणाला सल्ला देण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील अतिशय श्रेष्ठ-व तज्ञ अशा व्यक्तींना या मंडळावर सदस्य म्हणून घेतलेले आहे. त्यांनी तसा सल्ला देत रहावे अशी आमची त्यांना विनंती आहे. आर्थिक अंमलबजावणीसाठी योजना, प्रकल्प आणि कार्यक्रम तयार करण्यापूर्वी त्यांच्या सहाय्यानेच प्रथम ते निश्चित करून त्यांचे सर्वेक्षण व विश्लेषण करावे लागेल. तरच अशा अनेकविध समस्या, प्राधिकरणाला तसेच प्राधिकरणामार्फत या प्रदेशाच्या नागरिकांना सोडविणे शक्य होईल. परंतु याबाबतीत प्राधिकरणाला बांधकामविषयक जबाबदारी ज्याच्यावर लादलेली आहे असे कार्यकारी अभिकरण म्हणून काम करण्यापेक्षा प्रथमत: नियोजक व समन्वयक म्हणून तसेच विकास कार्याचा वित्त दाता म्हणूनच अधिक काम करावे लागेल.

ऑगस्ट १९७२ पासून अमलात असलेल्या उद्योग प्रस्थापित करण्यासंबंधीच्या धोरणाचा प्रादेशिक योजनेच्या संदर्भात नुकताच शासनाने संपूर्णपणे आढावा घेतला आहे. महानगर प्रदेश आयुक्त, पुढील बैठकीत प्रस्तुत शासकीय आदेशाच्या प्रती आपणास सादर करतील. आणि त्यानंतरच त्या धोरणाच्या तपशीलाचा प्राधिकरणाच्या जबाबदारीत कसा समावेश करावा कि ज्या योगे त्या धोरणाला संपूर्ण कायदेशीर पाठींबा मिळेल, हे आपण नंतर पाहू शकू.

नागरी मालमत्ता धारणेची कमाल मर्यादा अधिनियम अंमलात आला आहे पण निवेदने दाखल करण्याची शेवटची तारीख अद्याप पावेतो उलटलेली नाही. प्रदेशाच्या विकासासाठी कोणती मोकळी जमीन उपलब्ध होईल हे शासनाला व प्राधिकरणाला त्याअनुसार अधिक चांगल्या रीतीने कळू शकेल. या अधिनियमाच्या कलम २६ व २७ खालील सक्षम प्राधिका-याच्या शक्ती, शासनाकडून, महानगर प्रदेश प्राधिकरणाकडे निहित करण्यात येतील हे मी आपल्या निदर्शनास आणून देतो. प्राधिकरणाला आपल्या विकासविषयक योजना व प्रकल्प यांचा पाठ पुरावा करता यावा या दृष्टीने हा निर्णय घेण्यांत आला आहे.

आजच्या कार्यसूचीवर 'ईस्ट आयलंड टोल्वे' प्रकल्पाच्या शक्यता अहवालाचा (फीजिबिलिटी रिपोर्ट) उल्लेख आहे. सिडकोने नवीन मुंबईसाठी प्रारूप विकास योजना तयार करताना जी तत्वे विचारात घेतली आहेत तीसुध्दा, आणखी एक चर्चेचा विषय म्हणून कार्यसूचीवर दर्शविली आहेत. या दोन्ही मुद्दे या प्रदेशाचा फार मोठा फायदा होणार आहे.

माझे भाषण संपवण्यापूर्वी, बैठकीनंतर आपल्याला भोजनाचे आमंत्रण दिल्याबद्दल मी महापौरांचे आभार मानतो.

----------

: जोडपत्र 'क' :

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळाच्या सदस्यांना भत्ते देणे) विनियम, १९७६."

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, याचे कलम ६ पोट कलम (४) आणि कलम ५० यान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, याद्वारे, पुढील विनियम करीत आहे :-

(१) या विनियमांस, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळाच्या सदस्यांना भत्ते देणे) विनियम, १९७६ असे म्हणता येईल.

(२) प्राधिकरणाच्या कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सदस्यास (प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य-सचिव यांव्यतिरिक्त) आणि मंडळाच्या बैठकीसाठी जिला कायम आमंत्रित केले जाते अशा प्रत्येक व्यक्तीस, मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी आणि मंडळाच्या इतर कोणत्याही कामासाठी उपस्थित राहण्यासाठी येणारा वैयक्तिक खर्च भागविण्याकरिता दरमहा रुपये १५० इतकी रक्कम देण्यात येईल.

(३) तथापि, मंडळाचे सर्व सदस्य आणि कायम आमंत्रित व्यक्ती यांना, याशिवाय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रवास भत्ता विनियम, १९७५, अनुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(४) हे विनियम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये मंडळाची रचना करण्यासंबंधीची २७ डिसेंबर १९७५ ची शासकीय अधिसूचना क्रमांक: बीएमआरडीए-१४७५-३७१, च्या दिनांकापासून अंमलात येतील.

tms/8.7

..................

(101)

No.Authority/7/

Bombay Metropolitan Region
Development Authority,
18th Floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp.Sachivalaya, Bombay-21.

Date: 8th July, 1976.

The minutes of the Sixth meeting of the Authority held on 28th June 1976 are attached.

A marathi translation of the minutes will follow.

Staff Officer.

To

All Members.

tms/8.7

No.MC/Authority/VI/2586. B.M.R.D.A.

Minutes of the Sixth Meeting of the B.M.R.D.A. held on 28th June 1976, in the Bombay Municipal Corporation Hall.

1) The list of members present is attached. Annexure'A'

2) The meeting began with an address by the Chairman. A copy of the address is at Annexure 'B'.

ITEM No. 1 : Confirmation of the minutes of the last (fifth) meeting.

RESOLUTION 71 : The minutes of the fifth meeting held on 26th March 1976 were confirmed subject to the following amendments :-

Amendments to the Resolution 65 :

"(b) That the work programmes and the establishment of posts enumerated and explained itemwise in paragraph 11 of the agenda notes be approved and that on other matters set down therein the Metropolitan Commissioner be requested to take further action as suggested in each case."

"(i) The accounting and financial establishment (headed by the Financial Adviser) created by and under Resolution 58 should be constituted into the Accounting and Finance Management Division of the Authority."

Amendments to the Resolution 67 :

Para II should read as follows:-

"II. The Authority also directed that similar proposals for the Functional Boards should be formulated by the Metropolitan Commissioner in consultation with their Chairmen and Member-Secretaries and placed for consideration before the Committee already appointed under Resolution 52 and then put up to the Authority for orders."

ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the last meeting.

RESOLUTION 72 : The action taken was noted. It was agreed that the matters relating to land use control in Bombay (Resolution 68), with special reference to a reduction of F.S.I. in appropriate localities, should be placed before a (special) meeting of the Authority to be held in July, at Vashi.

ITEM NO. 3: B.M.R.D.A. (Allowance to Board Members) Regulations, 1976.

....2

<u>RESOLUTION 73:</u> The Authority approved the B.M.R.D.A.(Allowances to Board Members and Permanent Invitees) Regulations, 1976, as shown in Annexure 'C'.

<u>ITEM NO.4:</u> Budget of the Authority for 1976-77.

<u>RESOLUTION 74:</u> Resolved that

(i) The Financial Adviser shall place the regular budget at the next full meeting of the Authority to be held in August.

(ii) Pending preparation and passing of the Budget, the Metropolitan Commissioner is authorised, subject to concurrence of the Financial Adviser, (1) to incur expenditure on salaries and allowances, etc. to the extent of posts sanctioned by the competent authority (2) to incur day-to-day administrative expenditure as already authorised <u>vide</u> Resolution 6 of the First meeting and (3) to incur expenditure to the extent of Rs.60,000/- on furniture and office equipment. (As and when the Budget forms are finalised, expenditure on all these accounts should be incorporated therein and presented to the Authority for their approval.)

<u>ITEM NO.5:</u> East Island Tollway Project.

<u>RESOLUTION 75:</u> The Authority considered and unanimously approved the East Island Tollway Project proposal and authorised the Metropolitan Commissioner to take further action to seek the support and approval of the Govt. of India thereto, for the purposes of presentation to the banking institutions including the World Bank for its appraisal and to explore the possibility of their financing its implementation thereafter. The Authority was of the considered view that for the proper development of Bombay, this project should be given highest priority.

It was noted that the project in its final form would be placed before the Authority for final approval of its features and expenditure, as drawn up in consultation with the experts, who would appraise it as per the present decision.

<u>ITEM NO.6:</u> Draft Development Plan for New Bombay.

<u>RESOLUTION 76:</u> The item was deferred to a special meeting to be held in July at Vashi.

<u>ITEM NO.7:</u> Land for a new (automatic) telephone exchange in Ulhasnagar.

<u>RESOLUTION 77:</u> The Authority approved the proposal to acquire

....3

an area of about 2753 sq. yds. from plots No. 1-A-1, 1-A-2, 1-A-3 and 1-A-4 in Ulhasnagar for the purpose of establishment of a new exchange by the Telecommunications Department of the Government of India and authorise the Metropolitan Commissioner to make representation to the State Government for the said acquisition under section 32 of the B.M.R.D.A. Act. The land after acquisition should be made available by the Authority to the Telecommunications Department under the Government of India on terms to be mutually agreed upon in due course.

ITEM NO. 8: Creation of Central Services Group for Municipal Councils in the Bombay Metropolitan Region Development Authoity Region.

RESOLUTION 78 : The Authority approved in principle the proposal for the creation of a Central Services Group for Municipal Councils in the B.M.R.D.A. Region in the office of the Kalyan Complex of the Authority and sanctioned the creation of the following temporary posts : -

| | | |
|---|---|---|
| Executive Engineer | .. | 1 |
| Deputy Engineers | .. | 2 |
| Junior Engineers | .. | 2 |
| Draftsman | .. | 1 |
| Typist | .. | 1 |
| Peon | .. | 1 |

For the work proposed to be entrusted in the agenda note to the Group, it authorised the Metropolitan Commissioner to move the Government to vest in the engineering personnel of the Group the status of State Engineering staff under Section 72 of the Maharashtra Municipal Councils Act.

The financing arrangements of the proposal should be considered by the Standing Committee in consultation with the Presidents of the Municipal Councils concerned (who should be invited to the meeting) and placed before the Authority for approval. In particular the consultation with them will be on the feasibility of their sharing the cost.

The proposal as approved by the Standing Committee shall be placed before the Authority ex post facto for final approval.

ITEM NO.9: Area Development Projects in Kalyan Complex.

RESOLUTION 79: The Authority approved the proposal outlined in the agenda note for the area Developments projects in the Kalyan Complex and resolved that:

(i) the Metropolitan Commissioner should get detailed schemes drawn up by the Housing Urban Renewal and Ecology Board and identify the agencies who would undertake the schemes and receive loan assistance from the Authority;

(ii) based on the reports, the Standing Committee may sanction loans required by the agencies concerned;

(iii) the terms and conditions of the loans covering the interest rate, repayment period, guarantee, if any, etc. shall be decided by the Standing Committee;

(iv) the disbursement may be made from the Authority's Bombay Metropolitan Region Development Fund.

ITEM 10 : Staffing of the Functional Boards of the Authority.

RESOLUTION 80: The item was allowed to be withdrawn in the light of the provisions of the Ordinance since promulgated.

********

tms/7.7

List of members present at the 6th meeting held on 28th June 1976.

Annexure 'A'

Name of members.

Dr. Rafiq Zakaria,
Minister, Urban Development.

Shri Jagesh Desai,
Minister of State, Urban Development.

Shri Manohar G. Joshi,
Mayor of Bombay.

Shri S.A. Solanke,
Minister for Housing.

Shri P.K. Kunte,
Minister of State,
Housing & Public Works.

Shri S.G. Gholap,
Dy. Minister, Minor Irrigation,
Animal Husbandry, Dairy, Development of
Posts and Khar lands.

Shri V.G. Prabhugaonkar,
Minister of State Finance, Small Savings
Planning and Fisheries.

Shri Hashu Advani,
Bombay

Shri J.C. Agarwal,
Chairman, B.P.T.

Shri G.N. Banatwala,
M.L.A., Bombay.

Shri S.D. Baswant,
M.L.A., Shahapur.

Shri Hans Bhugra,
Bombay.

Shri C.M. Correa,
Chairman, HURE Board.

Shri B.G. Deshmukh,
Municipal Commissioner, B.M.C.

Shri S.S. Dighe,
M.L.A., Bombay.

Shri A.L. Gupta,
General Manager, C. Rly,

Shri Sudhir Joshi,
Bombay.

Shri M.A. Khandwani,
Bombay.

...2

Shri D.K. Khanvilkar,
President, Alibag, M.C.

Shri Sohan Singh Kohli,
Bombay.

Shri V.S. Mahadik,
Chairman, Standing Committee, B.M.C.

Shri C.S. Mehta,
Chairman, B.E.S.T. Committee, B.M.C.

Shri Pushpakant A. Mhatre,
Bombay.

Shri N.G.K. Murthi,
Chairman, W.R.M.Board.

Shri M.S. Muthanna,
General Manager, Bombay Telephones.

Dr. M.G. Parulekar,
President, Vasai M.C.

Shri D.B. Patil,
M.L.A., Panvel.

Shri D.N. Patil,
Chairman, Panchayat Samiti, Panvel.

Shri Nakul P. Patil,
M.L.A., Dombivali.

Shri V.K. Patil,
Chairman, Panchayat Samiti, Bhiwandi.

Shri V.K. Tembe,
M.L.A., Bombay.

Smt. Kamala Raman,
M.L.A., Bombay

Shri V. Ramnathan,
General Manager, W. Rly.

Shri D.D. Sathe,
C.S. to Govt. of Maharashtra.

Shri N.P. Thakkar,
Chairman, Improvements Committee, B.M.C.

Smt. Tarabai Vartak,
President, Zilla Parishad, Thana.

Shri H. M. Wangare,
President, Zilla Parishad, Kolaba.

Secretary to Govt. of Maharashtra,
Urban Development (invitee)

Managing Director,
City & Industrial Development Corpn.
of Maharashtra (invitee)

tms/6.7

Annexure 'B'



Text of the speech of Dr. Rafiq Zakaria, Minister for Revenue, Urban Development, Tourism, Protocol and Chairman, BMRDA, at the Sixth meeting on 28th June 1976.

---

I am happy that we are holding this meeting for the first time in the hall of the Bombay Municipal Corporation. I am sure that we would all like to place on record the co-operation and assistance rendered by Shri Nanalal Mehta, as the then Mayor, in the first establishment and working of the Authority. We look forward to Shri Manohar Joshi, the present Mayor to continue that tradition.

Government has recently amended by an Ordinance the law for our Authority. Many of the changes are intended to elaborate matters relating to the internal working of the Authority, such as the duties and functions of the Standing Committee and the Executive Committee. Government has also assumed the right to appoint a Financial Adviser whose duties and functions have been set down in the Act. This was a necessity which was clearly to be foreseen. It has also been declared that, in the matter of the executive working of the Authority, the Metropolitan Commissioner would act as the Chief of the entire team of staff and officials. Apart from all this, a review has been made of the duties and functions of the Authority itself, as provided in section 12 of the law. While retaining almost all the previous entries, may be with some verbal changes, certain welcome additions have been made. Naturally these are subject to any amendments that the Legislature may like to incorporate when passing the connected bill. Furthermore, it has been clarified that the Authority as a whole should not work at a loss and that, if this happened, the loss would be made up in the succeeding year. All these are healthy provisions that have been made to make the working of the Authority more integral and purposeful, something which we want the Region itself to achieve.

Some doubts have been brought to my notice whether in this process the Functional Boards have been relegated to a position different from that earlier contemplated by the statute. This is not so. Except for the clear enunciation of the principle, well known in public and private administration, that there can be no duplication of executive control, for the purposes for which the Functional Boards were incorporated in the law itself earlier, as statutory components of the Authority proper, there has been no change. Government has brought into the membership of these Boards persons of the highest eminence and expertise in the fields that they are respectively overseeing and advising the Authority. We would request them to continue to do so. Only thereby would it be possible for the Authority and through it the citizens of this Region, to find solutions to the multifarious problems that have to be first identified, investigated and appropriately analysed, before schemes, projects and programmes are formulated for economic implementation. Naturally, in the process, the role of the Authority would be primarily that of a planner and co-ordinator and also a financer of development financing nature, rather than that of an executive agency saddled with construction responsibilities by and large.

Contd....

Since we last met, the Government has also fully reviewed the Industrial Location Policy for the Region in juxtaposition to the Regional Plan that is in force since August 1973. I am sure the Metropolitan Commissioner will be formally placing before us at the next meeting copies of the relevant Government orders. We would then see how its contents ought to and could be incorporated into our own responsibilities, to secure full legal backing.

The Urban Ceilings Act is in force but the last date for filing statements is not yet over. That would give both the Government and the Authority a better picture of what vacant lands would become available, again for the development of the Region. I should, howev-er, bring to your notice the fact that the powers of the Competent Authority under sections 26 and 27 of this Act will be vested by Government in the Metropolitan Commissioner. This decision has been taken, with a view to giving more opportunity to the Authority to pursue its development schemes and projects.

In today's agenda you will find mention of the feasibility report for the East Island Tollway Project. The principles leading to the formulation of the Draft Development Plan for New Bombay by CIDCO is another item set out for discussion. These are to be of considerable benefit to the Region.

Before I conclude I would like to thank his Worship the Mayor for inviting us to lunch immediately after the meeting.

tms/256

Annexure 'C'

"BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY
(ALLOWANCES TO BOARD MEMBERS) REGULATIONS, 1976.

In expercise of the powers conferred by sub-section (4) of section 8, read with section 50 of the the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, the Bombay Metropolitan Region Development Authority hereby makes the following Regulations.

1. These Regulations may be called the Bombay Metropolitan Region Development Authority (Allowances to Board Members) Regulations, 1976.

2. Every member of a Functional Board of the Authority (other than their Chairmen and the Member-Secretaries) and every person who is a permanent invitee to the Board's meetings shall be paid Rs.150/- per month for meeting the personal expenditure in attending its meetings and for attending to any other work of the Board.

3. All the Members of the Board and the permanent invitees shall, however, be entitled to receive in addition travelling allowance and daily allowance in accordance with the Bombay Metropolitan Region Development Authority Travelling Allowance Regulations, 1975.

4. These Regulations shall have effect from the date of the Govt. Notification No. BMRDA/1475/471 dated the 27th December 1975 constituting the Boards under the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974.

**********